**महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील सह आयुक्त, गट-अ, उपायुक्त,गट-अ/ मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी), सहायक आयुक्त, गट-अ/ मुख्याधिकारी, गट-अ व सहायक आयुक्त, गट-ब / मुख्याधिकारी, गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीबाबतचे आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना असलेल्या अधिकाराचे विकेंद्रीकरणाबाबत...**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत, ७ वा मजला,**
**बेलापूर भवन, (सी.बी.डी.), बेलापूर, नवी मुंबई -४००६१४**
**क्र.नपप्रसं/सं.मु./आस्था/वे.नि./स्था.नि./२०२५/कक्ष-२** /3254
**दिनांक : १५ एप्रिल, २०२५.** 15 APR 2025

**वाचा** :- १) महाराष्ट्र शासन, राजपत्र-असाधारण भाग चार-अ, नगरविकास विभाग, अधिसूचना, महाराष्ट्र शहरी प्रशासकीय (सेवा प्रवेश) नियम, २०२३,दि.२५.०१.२०२३.
२) नगर विकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ-२०२१/प्र.क्र.८७/नवि-१४, दि.१६.०३.२०२२, दि.१७.०३.२०२२, दि.१२.१२.२०२२ व दि.१०.०८.२०२३.
३) नगर विकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ-२०२२/प्र.क्र.२०८/नवि-१४, दि.२२.०८.२०२३.
४) नगर विकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ-२०२४/प्र.क्र.४५०/नवि-१४, दि.१२.१२.२०२४.
५) संचालनालय स्थायी निदेश क्र.८-२०२३/५२९८, दि.०३.१०.२०२३.

## -: शुध्दीपत्रक :-

महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील सह आयुक्त, गट-अ, उपायुक्त, गट-अ/ मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी), सहायक आयुक्त, गट-अ/ मुख्याधिकारी, गट-अ व सहायक आयुक्त, गट-ब /मुख्याधिकारी, गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीबाबत विनाविलंब कार्यवाही पूर्ण होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ अन्वये प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून विभाग स्तरावरील सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय यांना वाचा क्र.५ येथील स्थायी निदेश क्र.८-२०२३, दि.०३.१०.२०२३ अन्वये अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग (गट-क) कर्मचाऱ्यांना मर्यादीत विभागीय परीक्षेच्या गुणवत्तेनूसार मुख्याधिकारी, गट-ब संवर्गात वाचा क्र.२ व ३ येथील नगर विकास विभागाकडील दि.१६.०३.२०२२ च्या आदेशान्वये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात आली आहे. सदर पदोन्नती आदेशामधील "प्रशिक्षणार्थी परिविक्षाधीन व On Field Training" हे शब्द वगळण्यात आले आहेत. तसेच वाचा क्र.२ येथील नगर विकास विभागाकडील दि.१६.०३.२०२२ च्या आदेशातील परिच्छेद क्र.६ ते ८, दि.१२.१२.२०२२ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्र.५ ते ७, दि.१०.०८.२०२३ रोजीच्या आदेशातील परिच्छेद क्र.७ ते ९ व वाचा क्र.३ येथील दि.२२.०८.२०२३ रोजीच्या आदेशातील पदोन्नती आदेशामधील "प्रशिक्षणार्थी परिविक्षाधीन व On Field Training" व विभागीय परिक्षा, प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत परिच्छेद वगळण्यात आले आहेत.

वाचा क्र.१ येथील, महाराष्ट्र शहरी प्रशासकीय (सेवा प्रवेश) नियम, २०२३, दि.२५.०१.२०२३ अन्वये महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवतील गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांचे सेवा प्रवेश नियम तयार करण्यात आलेले आहेत. सदर सेवा प्रवेश नियमातील नियम ६(ब) व नियम ८ येथील तरतूदीनूसार राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग (गट-क) कर्मचाऱ्यांना मर्यादीत विभागीय परीक्षेच्या गुणवत्तेनूसार मुख्याधिकारी, गट-ब संवर्गात पदोन्नतीने नियुक्ती देण्याबाबत नमूद आहे. त्यामुळे सदर अधिकाऱ्यांची नियुक्ती ही नामनिर्देशन नसून, पदोन्नती आहे.

स्थायी निदेश क्र.८-२०२३, दि.०३.१०.२०२३ मधील मुद्दा क्र.६ मध्ये **"राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग (गट-क) कर्मचाऱ्यांना मर्यादीत विभागीय परीक्षेच्या गुणवत्तेनूसार मुख्याधिकारी, गट-ब संवर्गात शासनाने नियुक्ती दिल्यानंतर, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम १० मध्ये प्रथम नियुक्तीनंतर प्रारंभिक वेतननिश्चिती करण्याची तरतूद नमूद आहे, त्यानूसार वेतननिश्चिती करण्यात यावी. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२३.०३.१९९४ मधील तरतूदींनूसार परिपूर्ण प्रस्ताव संचालनालयास सादर करावा. दि.२३.०३.१९९४ च्या निर्णयानूसार शासन स्तरावरुन कार्यवाहीअंती मान्यता/आदेश प्राप्त झाल्यानंतर वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे."** असे नमूद आहे.

## त्याऐवजी,

स्थायी निदेश क्र.८-२०२३, दि.०३.१०.२०२३ मधील मुद्दा क्र.६ मध्ये **"राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग (गट-क) कर्मचाऱ्यांना मर्यादीत विभागीय परीक्षेच्या गुणवत्तेनूसार मुख्याधिकारी, गट-ब संवर्गात शासन आदेशानूसार पदोन्नतीने पदस्थापना दिल्यानंतर, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम ११ मधील तरतूदी व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९, दि.२०.०२.२०१९ च्या वेतननिश्चिती स्पष्टीकरणानूसार वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे."** अशी नव्याने सुधारणा करण्यात येत आहे.

सबब महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग (गट-क) कर्मचाऱ्यांना मर्यादीत विभागीय परीक्षेच्या गुणवत्तेनूसार महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी, गट-ब संवर्गात पदोन्नतीने पदस्थापना दिल्यानंतर वेतननिश्चितीबाबत शासनाचे नियम, निर्णय, आदेश, परिपत्रक, अधिनियमातील तरतूदी व शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेऊन, संचालनालयास अनावश्यक पत्रव्यवहार न करता संबंधित विभागीय स्तरावरुन कार्यवाही करावी.

**( मनोज रानडे, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई**

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) मा.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).
३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
५) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा (सर्व विभाग).
६) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).
७) निवड नस्ती.

**प्रति :-**

१) विभागीय सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय (सर्व).
२) जिल्हा सह आयुक्त / सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व).
३) महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायायती (सर्व).

स्थायी निदेश क्र. ०८-२०२३

**महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील सह आयुक्त, गट-अ, उपायुक्त,गट-अ/ मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी), सहायक आयुक्त, गट-अ/ मुख्याधिकारी, गट-अ व सहायक आयुक्त, गट-ब /मुख्याधिकारी, गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीबाबतचे आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना असलेल्या अधिकाराचे विकेंद्रीकरणाबाबत.**

**नगरपरिषद प्रशासन संचालनालय**
**नवी मुंबई महानगरपालिका जुनी इमारत, ७ वा मजला,**
**बेलापूर भवन, (सी.बी.डी.), बेलापूर, नवी मुंबई -४००६१४**
**क्र.नपप्रसं/सं.मु.अ/आस्था/वे.नि./स्थायी निदेश/२०२३/कक्ष-२/5298**
**दिनांक : ०३ ऑक्टोबर, २०२३.**
03 OCT 2023

**वाचा** :- १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.डीएमए-१०९१/२७३३/नवि-१६, दि.१६.११.१९९१.
२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३, दि.११.०१.२००२.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा, दि.०६.०८.२००२.
४) नगर विकास विभाग पत्र क्र.नपप्रसं-१२०९/३९/नवि-१४, दि.०२.०२.२००९.
५) संचालनालय आदेश क्र.नपप्रसं/कक्ष-५/मु.अ.ब/आप्रयो/२०१५/३७६९, दि.३१.०८.२०१५.
६) संचालनालय परिपत्रक क्र.नपप्रसं/सं.मु.अ/आस्था/गट-अ-ब-क/पदोन्नती/आ.प्र.यो-लाभ/ वे.नि./ परिपत्रक/२०१८/कक्ष-२/६६, दि.०७.०१.२०१९ व जावक क्र.१०९, दि.१४.०१.२०१९.
७) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३, दि.०२.०३.२०१९.
८) संचालनालय पत्र क्र.नपप्रसं/सं.मु.अ/आस्था/परिपत्रक/२०२०/कक्ष-२/३४३, दि.२९.०१.२०२०.
९) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.एमसीओ-२०१९/प्र.क्र.१५२/नवि-१४, दि.०५.०८.२०२०.
१०) संचालनालय परिपत्रक क्र.नपप्रसं/मु.अ-आस्था/सेनि/सुचना/२०२०/कक्ष-२/२५३६, दि.१०.११.२०२०.
११) संचालनालय परिपत्रक क्र.नपप्रसं/मु.अ.आस्था/सेवाविषयक-बाबी-सूचना/२०२२/कक्ष-२/३२६४, दि.२४.०९.२०२१.
१२) संचालनालय पत्र क्र.नपप्रसं/सं.मु.आस्था/परिपत्रक/वेतननिश्चिती/२०२२/कक्ष-२/४३९४, दि.०७.१०.२०२२.
१३) महाराष्ट्र शासन, राजपत्र-असाधारण भाग चार-अ, नगरविकास विभाग, अधिसूचना, दि.२५.०१.२०२३.

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा (मुख्य) परीक्षेच्या अंतिम निकालाआधारे सरळसेवेने निवड झालेल्या महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील मुख्याधिकारी, गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना शासन आदेशानूसार राज्यातील विविध महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायती, विभागीय आयुक्त कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, नगरपरिषद प्रशासन संचालनालय तसेच अन्य आस्थापनेवर कार्यरत असतात. संबंधित कार्यरत अधिकारी यांची सेवापुस्तके नगरपरिषद प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालयाकडे ठेवली जातात. मुख्याधिकारी यांच्या सेवाविषयक बाबींवर वेळीच कार्यवाही होवून निपटारा होणेकरीता, वाचा क्र.१० येथील दि.१०.११.२०२० व वाचा क्र.११ येथील दि.२४.०९.२०२१ अन्वये सुचित करण्यात आले आहे. तसेच वाचा क्र.१ येथील नगर विकास विभागाच्या दि.१६.११.१९९१ च्या शासन निर्णयान्वये प्रादेशिक उप संचालक, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालयांना विभाग प्रमुख घोषित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील गट-अ व गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांना शासन आदेशानूसार सुधारीत वेतन आयोग लागू केल्यानंतर, सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर केल्यानंतर, पूर्वीच्या सेवा शासन सेवेस जोडून दिल्यानंतर, राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त/दुर्गम क्षेत्रात कार्यरत अधिकाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी मंजूर

केल्यानंतर, तसेच सरळसेवा नियुक्ती, नियमित/तदर्थ पदोन्नतीमुळे अनुज्ञेय होणाऱ्या वरीष्ठ वेतनश्रेणी मधील वेतननिश्चिती करणेबाबत शासनाचे नियम, निर्णय, आदेश, परिपत्रक, अधिनियमातील तरतूदी व शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेऊन, होणारा विलंब टाळणे व कामकाजाची गती वाढविणे याकरीता, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांना असलेल्या अधिकाराचे विकेंद्रीकरण करुन, महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ अन्वये प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून विभाग स्तरावरील सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय, यांना याविषयीचे अधिकार प्रदान करण्याचे विचाराधीन होते.

## आदेश :-

वाचा क्र.८ येथील नगर विकास विभागाकडील दि.०५.०८.२०२० च्या शासन निर्णयान्वये नगरपरिषद प्रशासन संचालनालयाचे बळकटीकरण करुन, नगरपरिषद प्रशासन संचालनालय (मुख्यालय), विभागीय स्तर व जिल्हा स्तरावरील आकृतिबंधास मान्यता देण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग चार-अ, नगरविकास विभाग अधिसूचना दि.२५.०१.२०२३ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील सह आयुक्त, गट-अ, उपायुक्त, गट-अ / मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी), सहायक आयुक्त, गट-अ / मुख्याधिकारी, गट-अ व सहायक आयुक्त, गट-ब / मुख्याधिकारी, गट-ब या संवर्गातील पदांच्या सेवा प्रवेशाचे विनिमय करणारे नियम निर्गमित करण्यात आले आहेत.

त्याअनुषंगाने, वाचा क्र.६ येथील दि.१४.०१.२०१९ च्या संचालनालय परिपत्रकान्वये वेतननिश्चितीबाबत प्रदान करण्यात आलेले विकेंद्रीकरण आदेश अधिक्रमित करुन, वेतननिश्चितीबाबत विनाविलंब कार्यवाही पूर्ण होण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र नागरी सेवा नियम, १९७९ अन्वये प्रादेशिक विभाग प्रमुख म्हणून विभाग स्तरावरील सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय, यांना याविषयीचे खालीलप्रमाणे अधिकार प्रदान करण्यात येत आहेत.

१) महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील सह आयुक्त, गट-अ, उपायुक्त, गट-अ / मुख्याधिकारी, गट-अ (निवडश्रेणी), सहायक आयुक्त, गट-अ / मुख्याधिकारी, गट-अ व सहायक आयुक्त, गट-ब / मुख्याधिकारी, गट-ब संवर्गातील अधिकाऱ्यांची सरळसेवा नियुक्ती, नियमित/तदर्थ पदोन्नती झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील तरतूदीनूसार अनुज्ञेय होणारी वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे.

२) संवर्गातील गट-अ, गट-ब व गट-क अधिकाऱ्यांना १२ व २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतरची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लाभ मंजूर केल्यानंतर अनुज्ञेय होणारी वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे.

३) संवर्गातील गट-अ, गट-ब व गट-क अधिकाऱ्यांना ७ व्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये १०, २०, ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लाभ मंजूर केल्यानंतर अनुज्ञेय होणारी वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे.

४) संवर्गातील गट-अ, गट-ब व गट-क अधिकाऱ्यांना राज्यातील आदिवासी/नक्षलग्रस्त/दुर्गम क्षेत्रात कार्यरत अधिकाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी संबंधित विभागीय स्तरावरुन मंजूर केल्यानंतर अनुज्ञेय होणारी वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे.

५) संवर्गातील गट-अ, गट-ब व गट-क अधिकारी हे शासकीय/निमशासकीय सेवेतील पदावर नवनियुक्तीमुळे नियुक्त होताना संबंधित अधिकारी यांनी सेवेत रुजू होण्यापूर्वी केलेली नियमित सेवा पूर्वीच्या शासन सेवेस जोडून दिल्यानंतर अनुज्ञेय होणारी वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे.

६) राज्यस्तरीय नगरपरिषद संवर्ग (गट-क) कर्मचाऱ्यांना मर्यादीत विभागीय परीक्षेच्या गुणवत्तेनूसार मुख्याधिकारी, गट-ब संवर्गात शासनाने नियुक्ती दिल्यानंतर, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ च्या नियम १० मध्ये प्रथम नियुक्तीनंतर प्रारंभिक वेतननिश्चिती करण्याची तरतूद नमूद आहे, त्यानूसार वेतननिश्चिती करण्यात यावी. तसेच वित्त विभाग, शासन निर्णय दि.२३.०३.१९९४ मधील तरतूदींनूसार परिपूर्ण प्रस्ताव संचालनालयास सादर

करावा. दि.२३.०३.१९९४ च्या निर्णयानूसार शासन स्तरावरुन कार्यवाहीअंती मान्यता/आदेश प्राप्त झाल्यानंतर वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे.

७) महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील अधिकार हे शासनाच्या आदेशानूसार मंत्रालयीन विभागामध्ये व अन्य कार्यालयाच्या आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने / पदोन्नतीने व इतर कारणामुळे कार्यरत अधिकाऱ्यांच्या प्रकरणी, तसेच प्रशासकीय विभागाच्या नियंत्रणाखालील केंद्र व राज्य शासनाच्या अंतर्गत सुरु असलेल्या विविध योजना व अभियांनातर्गत अन्य कार्यालयाची नवनिर्मिती होवून पदनिर्मिती झाल्यास संबंधित कार्यालयाच्या नजीकच्या विभागाने वेतननिश्चिती करणे, आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या मूळ सेवापुस्तकात वेतननिश्चितीची नोंद घेऊन प्रमाणित करणे.

सबब महाराष्ट्र शहरी प्रशासकीय सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क संवर्गातील अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीबाबत शासनाचे नियम, निर्णय, आदेश, परिपत्रक, अधिनियमातील तरतूदी व शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेऊन, संचालनालयास अनावश्यक पत्रव्यवहार न करता संबंधित विभागीय स्तरावरुन कार्यवाही करावी.

नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई — आयुक्त तथा संचालक ★

Manoj Vijay Ranade

Digitally signed by Manoj Vijay Ranade
Date: 2023.10.03 12:26:46 +05'30'

**( मनोज रानडे, भा.प्र.से. )**
**आयुक्त तथा संचालक**
**नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई**

**प्रत माहितीसाठी अग्रेषित :-**

१) मा.प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त कार्यालये (सर्व).
३) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई.
४) जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालये (सर्व).
५) सह संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा (सर्व विभाग).
६) नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई (सर्व कार्यासन).
७) निवड नस्ती.

**प्रति :-**

१) विभागीय सह आयुक्त / उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन, विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक कार्यालय (सर्व).
२) जिल्हा सह आयुक्त / सहायक आयुक्त, नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय (सर्व).
३) महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायायती (सर्व).